**नियमित दिवाणी दावा क्र. २५६/२०२१**

**निशाण ३१ खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी विना कैफीयतचा आदेश रद्द होऊन कैफीयत स्वीकारण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. अर्जात प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे कथन असे की, सदरहू दाव्याचे समन्स प्रतिवादी यांना दि. १९/११/२०२१ रोजी बजावणी होऊन ते दि. ३०/११/२०२१ रोजी दाव्याच्या कामी हजर झाले होते. दरम्यानच्या काळात कोरोना या आजारामुळे संपूर्ण देशामध्ये व महाराष्ट्र राज्यामध्ये संचारबंदी असल्यामूळे व यातील प्रतिवादी हे मोलमजुरी करण्याकामी परगावी गेल्यामूळे त्यांना मुदतीत कैफीयत देता आली नाही. त्यामूळे, या न्यायालयाने त्यांचेविरुध्द दि. ०१/१२/२०२२ रोजी विनाकैफीयतचा आदेश पारीत केलेला आहे. सदरचा दावा हा स्थावर मिळकतीसंबंधी असल्यामूळे सदरचा विनाकैफीयतचा आदेश रद्द होऊन प्रवितादींची कैफीयत स्वीकारण्यात यावी अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. सदर अर्जास वादी तर्फे म्हणणे देण्यात आले. त्यात वादीचे कथन असे आहे की, सदरचा अर्ज कायदेशीर नसून तो रद्द होण्यास पात्र आहे. तसेच, प्रतिवादी यांनी जाणीवपूर्वक कैफीयत देण्यास विलंब केलेला असून प्रतिवादींचा अर्ज मंजूर करणेचा झाल्यास त्यांचेकडून प्रत्येकी दोन हजार रुपये इतका खर्च वादीस मिळावी अशी त्याने विनंती केली आहे.

४. उभय पक्षाचा युक्तीवाद ऐकला. सदरचा दावा वादीने प्रतिवादींविरुध्द साठेखतावरुन खरेदीखत होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी अर्ज नि.क्र. २९ अन्वये त्यांची कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होऊन मागितलेला होता. सदरचा अर्ज गुणदोषावर मंजूर करण्यात आलेला आहे. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जामध्ये कोरोना या आजारामुळे संपूर्ण देशामध्ये व महाराष्ट्र राज्यामध्ये संचारबंदी असल्यामूळे व यातील प्रतिवादी हे मोलमजुरी करण्याकामी परगावी गेल्यामूळे त्यांना मुदतीत कैफीयत देता आली नाही असे कारण नमूद केले

आहे. सदर कथनाच्या पृष्ठर्थ त्यांनी नि. ३२ ला शपथपत्र दाखल केलेले आहे. अर्जात नमूद असलेले कारण तसेच दाव्यातील मागणी पाहता दाव्याचा निर्णय गुणदोषावर होणेसाठी प्रतिवादींविरुध्द झालेला विनाकैफीयत आदेश रद्द होणे हे न्यायाचे ठरेल. जर प्रतिवादींना कैफीयत दाखल करुन त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली नाही तर ते त्यांचे न्याय हक्कापासून वंचित राहू शकतात. परंतू प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी मुदतीत कैफीयत दाखल न केल्यामुळे वादीस विनाकाराण विलंब व मानसिक त्रास सहन करावा लागला. त्यामुळे, सदरची बाब प्रतिवादींवर खर्चाचे आदेश पारीत करुन काही अंशी कमी करता येवू शकते. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो–

**<u>आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी नि.क्र. २९ वरील आदेशाची पुर्तता करण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी नि.क्र. २९ वरील आदेशाची पुर्तता केल्यानंतर त्यांचेविरुध्द झालेला विनाकैफीयत आदेश रद्द होऊन त्यांची कैफीयत स्वीकारण्यात येईल.

दिनांक – २५/०६/२०२५.

SACHIN SAMBHAJI SALUNKHE

Digitally signed by SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Date: 2025.06.25 16:20:09 +0530

**(एस. एस. साळुंखे)**

२ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला

<u>**C E R T I F I C A T E**</u>

I affirm that, the contents of this PDF file of Order/Judgment are same word to word as per the original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | V. A. Dange |
| Court | : | $2^{nd}$ Jt. C. J. J. D., Sangola. |
| Date | : | 25/06/2025 |
| Order signed by the Presiding Officer | : | 25/06/2025 |
| Order Uploaded on | : | 26/06/2025 |